सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**

एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,

E-MAIL ID – lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

**प्रेस नोट क्र. १०** **दिनांक :- २०/०३/२०२४**

# कुळगांव पोलीस ठाणे येथील दाखल खुनाच्या गुन्हयांचा तपास करुन आरोपीतांस केली अटक

दिनांक ०१/०३/२०२४ रोजी बदलापुर ते मुरबाड जाणा-या रोडवर मो-याचा पाडा गावचे हददीतील बारवी नदीच्या ब्रिजखाली पाण्याचे पात्रात दगडावर एक अनोळखी इसम मृत अवस्थेत मिळुन आला म्हणुन कुळगांव पोलीस ठाणे येथे अ.मृ क्र. ०६/२०२४ सी. आ. पी. सी. १७४ प्रामणे दाखल करण्यात आला. सदर सदर अ. मृ यांची गाभिर्य लक्षात घेवुन मा. श्री. डॉ. डी. एस स्वामी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण तसेच श्रीमती डॉ. दिपाली घाटे, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, श्री. जगदीस शिंदे उप विभागीय पोलीस अधिकारी, मुरबाड यांनी तपासाकामी कुळगांव पोलीस ठाणेचे पथक तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले.

त्याप्रमाणे अ. मृ. चौकशी करीता कुळगांव पोलीस ठाणे, ठाणे ग्रामीण येथेली प्रभारी अधिकारी सपोनि/गोविंद पाटील, पोहवा/२४८३ डी. पी. केंगार, पोहवा/२८२० पवार, पोहवा/२८७८ खडताळे, पोशि/२०८६ राहुल दाभाडे असे पथक तयार करण्यात आले. चौकशी दरम्यान असे निषन्न झाले की, यातील मयत योगेश गोटीराम केणे हा दिनांक २९/०२/२०२३ रोजी दारु पिवुन घरी आला आणि आरोपीत संतोष गोविंद नाईक यास शिवीगाळ करुन तुमच्या पेंढयाला आग लावतो असे सांगुन घराचे आजुबाजुला फिरत होता. तेव्हा आरोपीत यास त्याचा राग आला आणि तो मयत यास मारण्यासाठी त्याचे अंगावर धावला तसा मयत पळुन गेला. त्याचा आरोपीत यास राग होता. त्यानंतर रात्री ०१.०० वाजताचे सुमारास मयत योगेश गोटीराम केणे हा दारु पिवुन घरी येत असतांना आरोपीताने पाहीले तो घरी येताच त्यास पकडुन ठोश्याबुक्याने मारहाण केली असता मयत बेशुध्द आवस्थेत खाली पडला. तेव्हा आरोपीत यांनी मयत यास त्याचे घरातील जनावराचे खादयाचे काळया रंगाचे प्लॅस्टीक पिशवीमध्ये भरुन त्या पिशवीचे तोंड बांधले आणि पिशवी मोटार सायकलवर दोरीने बांधुन मोटार सायकलवरुन त्याचे घरापासुन सुमारे ७ ते ८ किलो मिटर अंतरावर बदलापुर ते मुरबाड जाणा-या रोडवर मोऱ्याचापाडा गावचे हद्दीतील ब्रिजवरुन बारवी नदीचे पाण्याचे पात्रात असलेल्या दगडावर फेकुन दिले त्यामुळे मयताच्या डोक्याला, कानाला व इतर ठिकाणी गंभीर मार लागुन जखमी झाल्याने त्याचा मृत्यु झाल्याचे निष्पन्न केले. त्यानुशंगाने दिनांक १८/०३/२०२४ रोजी आरोपीतां विरुध्द कुळगांव पोलीस ठाणे गु. रजि. क्र. २६/२०२४ भा.द.वि.स कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपीतांस अटक करण्यात आली आहे.

सदरचा गुन्हाचा तपास मा. श्री. डॉ. डी. एस स्वामी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण तसेच श्रीमती डॉ. दिपाली घाटे, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, जगदिश शिंदे उप विभागीय पोलीस अधिकारी, मुरबाड यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सपोनि/गोविंद पाटील, पोहवा/२४८३ डी. पी. केंगार, पोहवा/२८२० पवार, पोहवा/ २८७८ खडताळे, पोशि/२०८६ राहुल दाभाडे या पथकाने गुन्हयांची उकल करुन आरोपीतास अटक केली.

सदर गुन्हयांचा पुढील तपास सपोनि/ गोविंद पाटील प्रभारी अधिकारी, कुळगांव पोलीस ठाणे हे करीत आहेत.
**************************************************************************